वाचले:-

१) क्षेत्रिय अधिकारी, ग क्षेत्रीय कार्यालय यांचे पत्र क्रमांक गक्षेका/प्रशा/०१/कावि/५४१/२०२६. दिनांक २८/०९/२०२६.

२) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ति वेतन) नियम १९८२ मधील नियम १०(१).

३) अधिकार प्रदान आदेश क्रमांक साप्रवि/०२/कावि/४५८/२०२५ दिनांक ०३/१०/२०२६

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११०१८.
सामान्य प्रशासन विभाग
क्रमांक: साप्रवि/०५/कावि/३८३/२०२६
दिनांक : १८/११/२०२६

विषय :- नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तिबाबत.....
श्री. जगताप चंद्रकांत कृष्णाजी, पदनाम - मजूर, (संगणक क्रमांक १३२९८)

आदेश,

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.कडील श्री.जगताप चंद्रकांत कृष्णाजी यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडील गट ड मधील मजूर या पदावर वाचले क्र.१ चे आदेशान्वये कायम स्वरुपी आस्थापनेवर सामावून घेतले आहे. दिनांक २२/०६/२०२२ रोजी ते ग क्षेत्रीय मुख्य कार्यालय विभाग येथे मजूर या पदावर रूजू झाले आहेत. त्यांच्या सेवानोंद पुस्तकामधील नोंदी नुसार त्यांची त्यांची जन्मतारीख २२/१२/१९६६ अशी असून दिनांक २१/१२/२०२६ रोजी त्यांच्या वयास ६० वर्ष पूर्ण होत आहेत.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ति वेतन) नियम १९८२ मधील नियम १०(१) नुसार गट ड मधील कर्मचा-यांना वयाची ६० वर्ष पूर्ण होतील त्या महिन्याच्या शेवटच्या तारखेस नियत वयोमानानुसार मध्यानोत्तर सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

क्षेत्रिय अधिकारी, ग क्षेत्रीय कार्यालय,यांनी दिनांक २८/०९/२०२६ रोजीच्या पत्रान्वये, श्री. जगताप चंद्रकांत कृष्णाजी, मजूर यांचेकडून म.न.पा.चे घर बांधणी कर्ज व घर दुरुस्ती कर्ज, वाहन कर्ज, संगणक कर्ज, पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवकांची सहकारी मर्या.(सोसायटी), कामगार कल्याण निधी अग्रीम, इत्यादी येणे बाकी दिसुन येत नाही. तसेच सद्यस्थितीत त्यांची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नाही. असा अहवाल सादर केला असून, त्यांना दिनांक ३१/१२/२०२६ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणेस शिफारस केली आहे.

सबब, मी सहाय्यक आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, क्षेत्रिय अधिकारी, ग क्षेत्रीय कार्यालय, यांचेकडील दिनांक २८/०९/२०२६ रोजीचा अहवाल, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ति वेतन) नियमातील उक्त तरतूद विचारात घेऊन उपरोक्त वाचले क्रमांक ३ वरील आदेशान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार श्री.जगताप चंद्रकांत कृष्णाजी, मजूर यांना दिनांक ३१/१२/२०२६ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणेस या आदेशान्वये मान्यता देण्यात येत आहे.

श्री. जगताप चंद्रकांत कृष्णाजी, मजूर यांना निवृत्तिवेतन,सेवा-उपदान इ.रकमा अदा करण्यासाठी आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता सबंधित विभागाने करून प्रकरण पुढील कार्यवाहीसाठी सत्वर लेखा विभागाकडे पाठवावे.लेखा विभागाने श्री.जगताप चंद्रकांत कृष्णाजी, मजूर यांचेकडून महापालिकेस घरबांधणी कर्ज,वाहन कर्ज, संगणक कर्ज, वैद्यकीय अग्रीम, इत्यादी पैकी अथवा अन्य काही रक्कम येणे बाकी आहे काय? या बाबत खातरजमा करावी व त्यांचे कडून काही येणे बाकी रक्कम असल्यास, ती त्यांना देय असलेल्या रकमेतून वसूल करून अंतिमत: देय रक्कम त्यांचे सेवानिवृत्तिचे दिनांकास अदा करावी.

प्रस्तुत आदेशाची नोंद श्री. जगताप चंद्रकांत कृष्णाजी पदनाम -मजूर यांचे सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका स्थापना ११/१०/८२ पिंपरी-४११०१८

Digital Signature
Signature Valid
Name : AJINKYA YE
Designation:Assistant Commissioner
Location:.
Date :18-11-2026 20:26

प्रती - 1) श्री. जगताप चंद्रकांत कृष्णाजी, पदनाम - मजूर ग क्षेत्रीय कार्यालय विभाग

प्रत - 1) लेखा विभाग २) मुख्य लेखापरिक्षण ३) वैयक्तिक नोंद कक्ष ४) गोपनिय अहवाल कक्ष ५) सेवाज्येष्ठता कक्ष ६) मागासवर्ग कक्ष ७) संगणक कक्ष - सामान्य प्रशासन ८) विद्युत विभाग ९) दूरसंचार विभाग १०) कामगार कल्याण विभाग ११) पि. चि. म. न. पा. कर्मचारी महासंघ १२) पि.चि.म न.पा. सह. पतसंस्था १३) ग क्षेत्रीय कार्यालय विभाग २/- सोबत श्री. जगताप चंद्रकांत कृष्णाजी पदनाम - मजूर यांचे सेवानोंद पुस्तक आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.